Exh. C-2

**रत्नागिरी येथील मे. कामगार न्यायाधीश सो. यांचे कोर्टात**

REFERENCE (IDA) NO.10 of 2022 CNR NO. MHLC080000882022

विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी ------------- प्रथम पक्षकार

**विरुध्द**

सिध्दार्थ गुणाजी पवार ------------- द्वितीय पक्षकार

प्रथम पक्षकार तर्फे एकतर्फा आदेश सेट असाईड करीता अर्ज

सदर कामी मे. न्यायालयाचे प्रथम पक्षकार यांचे विरुध्द दिनांक २९.०८.२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत केला आहे. सदर आदेश रद्द होणेकरीता प्रथम पक्षकार यांचा विलंबाचे कारणासह मे. न्यायालय यांचेकडे सदरचा अर्ज सादर करण्यात येत आहे.

सदर अर्ज प्रथम पक्षकार त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्याकरीता दाखल करीत आहेत. प्रथम पक्षकार विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी यांचेकरीता प्राधिकृत सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी पदसिध्द अधिकारी असून तत्कालीन वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, खेड यांचेकडे सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीरकण विभाग रत्नागिरी या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. वनपरिक्षेत्रांतर्गत रोपवाटीका व रोपवनांची कामे यशस्वीपणे पार पाडणे तसेच सहाय्यक वनसंरक्षक पदाचा कार्यभार पाहताना रत्नागिरी विभागा अंतर्गत इतर ६ परिक्षेत्रांतर्गत रोपवाटीका व रोपवनाची कामे तपासणे ही कामे करावी लागत होती. तसेच या कार्यालया अंतर्गत पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे कार्यालयीन कामकाजाचा अतिरिक्त ताण होता. असे क्षेत्रीय कामकाज व प्रशासकीय अडचणीमुळे प्रथम पक्षकार यांना मे. न्यायालया मध्ये उपस्थित राहणे शक्य झाले नव्हते. प्रथम पक्षकार यांनी मे. न्यायालयामध्ये नेमले तारखेला हजर न राहून आवश्यक ती कार्यवाही करणेसंदर्भात कोणताही हेतूत: निष्काळजीपणा केलेला नाही.

प्रस्तुत अर्ज हा परिपूर्ण स्वरुपाचा असल्यामुळे तो चालवून निकाली करणेचा मे. न्यायालयास हक्क, अधिकार आहे. सामनेवाला यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द न झालेस प्रस्तुत केसकामी प्रथम पक्षकार यांना त्यांची बाजू मांडता येणार नाही. व तसे झालेस त्यांचे विरुध्द निकाल होवून प्रथम पक्षकार यांचे पैशाच्या स्वरुपात भरून न निघणारे असे नुकसान होणार आहे. तथापि प्रस्तुत आदेश रद्द केलेस तक्रारदार यांचे कोणतेही नुकसान होणार नसून प्रकरण गुणदोषावर चालणेस मदतच होणार आहे.

तरी प्रथम पक्षकार यांची विनंती अशी की

१. प्रथम पक्षकार यांचे विरुध्द दिनांक. २९.०८.२०२३ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करणेस विनंती आहे.

२. न्यायाचे दृष्टीने आवश्यक ते आदेश वेळोवेळी करणेत यावे.

३. प्रस्तुत अर्जात जरुर ती दुरुस्ती करणेची परवानगी मिळावी.

येणेप्रमाणे अर्ज आहे.

दिनांक २०/११/२०२४

O
Otherside to say
JUDGE
Labour Court, Ratnagiri
27/11/2024

21/10/2025

(अं. दि. तरडे)
सहाय्यक वनसंरक्षक,
सामाजिक वनीकरण विभाग ,रत्नागिरी
प्रथम पक्षकार विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग, रत्नागिरी तर्फे प्राधिकृत

Scanned with OKEN Scanner